## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय धोबी ठेकेदार नियुक्त करण्याबाबत...

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई येथील अधिकाऱ्यांचे कोट, नॅपकीन, चादरी (लहान व मोठया) खुर्चीवरील कव्हर्स, गाडीचे सीट कव्हर्स (लहान व मोठे), पडदे (लहान व मोठे) ईत्यादी धुलाईसाठी (२४ महिने कालावधीकरिता) धोबी ठेकेदार नियुक्त करण्याकरिता दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

सदर कामाकरिता इच्छुक स्थानिक धोबी ठेकेदारांनी आपले दरपत्रक मोहरबंद पाकीटातून सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई या पत्त्यावर दिनांक १ ऑक्टोबर, २०२६ रोजी किंवा तत्पूर्वी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावे.

दरपत्रक स्वीकृत झाल्यास त्यानुसार आपणास कळविण्यात येईल. मात्र कोणतेही दरपत्रक स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार या सचिवालयाने राखून ठेवला आहे. कृपया यांची नोंद घ्यावी, ही विनंती.

सचिव-४,<br>
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,<br>
विधान भवन, मुंबई.